FORM-1A

(EY)

N.C.R.B.
I.I.F.-1

60998

पहिली खबर
FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य ... जिल्हा ... पोलीस ठाणे ... पहिली खबर क्र. ... वर्ष ... दिनांक ...
   State / District / Police Station / FIR No. / Year / Date

2. (i) अधिनियम Act ... कलमे Sections ...
   (ii) अधिनियम Act ... कलमे Sections ...
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...

3. (a) अपराधाची घटना : वार ... तारीख पासून ... वेळ ... तारीख पर्यंत ... वेळ ...
   Occurrence of Offence : Day / Date from / Time / Date to / Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   1) 00.00 ते 03.00 2) 03.00 ते 06.00 3) 06.00 ते 09.00 4) 09.00 ते 12.00 5) 12.00 ते 15.00
   6) 15.00 ते 18.00 7) 18.00 ते 21.00 8) 21.00 ते 24.00 9) 06.00 ते 18.00 10) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख ... वेळ ...
   Information received at P.S. Date / Time

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ... तारीख ... वेळ ...
   General Diary Reference : Entry No. / Date / Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी / तोंडी Written / Oral ...

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ... चौकी /बीट /दुरक्षेत्र नाव व क्र. ...
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/ Beat/ O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव ... ठिकाणीचे पत्ता ... गल्ली ... रस्त्याचे नाव ...
   Address of Occurrence : Name / No. if any / Ward / Name of road
   जवळची ओळख असलेली जागा ... गाव ... पोष्ट ... तालुका ... जिल्हा ... राज्य ...
   Nearest identifiable Place / Village / Post / Taluka / Dist. / State

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ... तालुका ... जिल्हा ... राज्य ...
   In case, outside the limit of this Police Station / Taluka / Dist. / State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant /Informant : Permanent Address

   (a) नाव ... (b) वडिलाचे / पतीचे नाव ...
   Name / Father's/Husbands Name

   (c) जन्म तारीख व वय ... (d) राष्ट्रीयत्व ... फोन नं. ...
   Date of Birth & Age / Nationality / Phone No.

   (e) पारपत्र क्रमांक ... दिल्याचा दिनांक ... दिल्याचे ठिकाण ... (f) व्यवसाय ...
   Passport No. / Date of Issue / Place of Issue / Occupation

   (g) धर्म Religion ... जात Caste ... जनजात Sub-Caste ...

   (h) पत्ता : गल्ली/सर्वे नं. ... घर/नाव नंबर ... फोन/मो. नंबर ... पॅन नं. ... ओटर्स नं. ...
   Address : Ward / House/Name No. / Phone/M. No. / Pan No. / Card No.
   रस्त्याचे नाव ... जवळचे प्रसिध्द ठिकाण ... गाव ... पोष्ट ... पो. स्टे ...
   Road / Nearest identifiable place / Village / Post / P. Stn.
   तालुका ... जिल्हा ... राज्य ... सध्याचा पत्ता ...
   Taluka / Dist. / State / Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म I-B वर वेगळ्या सिटवर घेऊन पोसीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of Known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form I-B of attach FIR I-B to case diary)

...

...

...

शा.मु.औ.(वाय) ३५४-(२०००पुस्तके)-१-२०१६

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ...
   Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
   Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proform) write down details on blank back page.
   ...

10. a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ...
    Total value of properties stolen/ involved.
    b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recover Properties) ...

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ...
    Unnatural/Accidental Death. case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील को-या पानावर लिहावे.
    F. I. R. Information brief Contents (Attach separate sheets, if required) :Detail Write down back blank page.
    ...

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरुन कॉलम नं. 2. मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करुन तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा ...
    2. तपास नाकारण्यात आला. त्याचे कारण. ...
    3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ... जिल्हा ... राज्य ...
    Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No.2:
    (1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ..... Rank ..... No. .....
    to take up the Investigation or
    (2) Refused Investigation due to ..... (3) Transferred to P.S. .....
    District ..... on point of jurisdiction.

    तक्रारदाराने/फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून/वाचून/ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
    F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.
    (R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
    Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

15. १. न्यायालयास सादर केल्याची तारीख ...
    1. Date and time of submitted to the Court

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही
Signature of the Officer Incharge, Police Station
संपूर्ण नाव Name ...
पदनाम Rank ... जी.ए.साळके
तपासिक अं. चा कोड क्र. ... पो.ना.७२९
Posting. सटाणा,पो.ठाणे जि.नाशिक(ग्रा.)
Code No. of I. O. ...

प्रत, 2. फिर्यादी 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with CamScanner

फिर्याद

सटाणा पोलीस ठाणे, नाशिक ग्रामीण
दिनांक १९ /७/२०१९

मी अरुण गोपीनाथ निकम वय ४५ वर्षे व्यवसाय शेती रा.मुंगसे ता.बागलाण जि.नाशिक मो.क्र. ९४२१३९२८२१

समक्ष पोलीस ठाण्यात हजर राहुन फिर्याद देतो कि, मी वरील ठिकाणी राहत असुन शेती व्यवसाय करातो. माझी मुंगसे (विजय नगर) येथे शेती आहे. सदर शेती मध्ये जाखोड ता.बागलाण या धरणातुन गाळ काढून शेतात टाकण्यासाठी परवाणगी मिळणे कामी मी दि. ०३.०६.२०१९ रोजी सहाय्यक अभियंता लघुपाटबंधारे सिंचन शाखा येथे अर्ज केला होता. त्यानंतर दि.०४.०६.२०१९ रोजी मी सहाय्यक अभियंता लघुपाटबंधारे सिंचन शाखा कार्यालय, सटाणा येथे जाऊन श्री.रामोळे शाखाधिकारी यांना भेटुन त्यांना सांगितले की, पाऊसाचे दिवस सुरु झाले आहे मला गाळ काढण्याची परवानगी लवकर दया. त्यावेळी श्री.रामोळे हे मला म्हणाले की, तु मला २५,०००/- ते ३०,०००/- रुपये दे मी लगेच गाळ काढण्याची परवानगी देतो. त्यावर मी त्यांना म्हणालो की, पैसे कशाचे दयायचे आम्ही तर चांगले काम करीत आहे. त्यावर श्री.रामोळे साहेब म्हणाले की, तु मला २५,०००/- ते ३०,०००/- रुपये दिले तरच मी तुला धरणातुन गाळ काढण्याची परवानगी देतो. त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, माझेकडे येवढे पैसे नाही. ते म्हणाले की, आज रोजी ११ हजार रुपये दे मी तुला लगेच परवानगी देतो. म्हणुन मी माझी इच्छा नसतांना त्यांना ११०००/-रुपये दिले. त्यानंतर रामोळे मला म्हणाले की, मी तुला परवानगी देतो तु गाळ काढण्याचे काम सुरु कर व बाकी राहीलेले वीस हजार रुपये दि.१३.०६.२०१९ रोजी मला आणुन दे मी त्यांना होकार दिला. त्यानंतर त्यांनी मला जाखोडा धरणातील गाळ काढण्याची परवानगीचे पत्र दिले.

त्यानंतर दि.१२.०६.२०१९ रोजी श्री.रामोळे यांनी माझे मोबाईलवर कॉल करुन बाकी राहीलेले २०,०००/-रुपये दि.१३.०६.२०१९ रोजी घेऊन ये पैसे आणले नाही तर तुझे गाळ काढण्याचे काम मी थांबवतो असे म्हणाले म्हणून मी माझा मित्र महेंद्र असे ॲन्टी करप्शन ब्युरो, नाशिक येथे दि.१२.०६.२०१९ रोजी गेले तेथे श्रीमती नाईक पो.निरी.ॲन्टी करप्शन ब्युरो, नाशिक यांना समक्ष भेटुन श्री.रामोळे यांचे विरुध्द लाच मागणी केले बाबतची तक्रार दिली आहे.

त्यानंतर श्रीमती नाईक यांनी मला कळविले की, आम्ही उदईक दि.१३.०६.२०१९ रोजी सटाणा येथे सापळा पथकासह येतो तुम्ही तेथे हजर रहा.

दि.१३.०६.२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता मी तसेच माझा मित्र महेंद्र असे सटाणा गांवात श्रीमती नाईक व त्यांचे सोबत असलेले पंच व सापळा पथकातील सदस्य अशांना भेटलो. त्यानंतर श्रीमती नाईक यांनी आमची व पंच.नं. १)भिमा प्र.दौंड कनिष्ठ हातमाग पर्यवेक्षक २)श्री.सचिन रामदास काकड, वरिष्ठ लिपीक तसेच सापळा पथकातील सदस्य पोहवा कुशारे, पोना डोगरे, चापोना दाभोळे यांचा आपसात परिचय करुन दिला.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्रीमती नाईक मॅडम याचे सुचनेप्रमाणे पंचांनी मला माझे नांव गांव व तक्रारी बाबत विचारले असता मी माझे नांव तसेच माझी तक्रार दोन्ही पंचांना सांगितले. तसेच श्रीमती नाईक यांनी मी दि.१२.०६.२०१९ रोजी दिलेली तक्रार पंचांना वाचण्यास दिली. ती पंचांनी वाचुन मी तोंडी सांगितल्या प्रमाणे बरोबर असल्यांने त्या तक्रारीवर सहया केल्या.

श्री.रामोळे शाखाधिकारी हे खरोखरच माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करण्याचे ठरले. त्यानंतर पोनि श्रीमती नाईक मॅडम यांनी मला व पंच न १ श्री दौंड व मित्र महेंद्र अशांना योग्य त्या सुचना देवुन, व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर ते सुरु करुन माझे शर्टचे डावे बाजुचे खिशांत ठेवले व आम्हाला माझे बोलेरो जिपने श्री.रामोळे यांचे भेट घेणेकरीता पाठविण्यात आले. मी व पंच नं.१ श्री.दौंड तसेच माझा मित्र महेंद्र असे लघुपाटबंधारे कार्यालय सटाणा येथे गेलो तेथे श्री.रामोळे यांची भेट झाली त्या दरम्यान श्री.रामोळे यांनी पंच नं.१ श्री.दौंड यांचे समक्ष मला माझेकडे जाखोडा धरणातुन गाळ काढण्याची परवानगी दिल्याचे मोबदल्यात व गाळ काढण्याचे काम सुरु ठेवण्यासाठी तसेच केस न करण्यासाठी माझे कडुन पुर्वी घेतलेले ११०००/-रुपये मान्य करुन तडजोड अंती १५,०००/-रुपये दे असे सांगितले. त्यावर मी ठिक आहे मी थोडयाच वेळांने आणून देतो असे सांगितले त्यानंतर आम्ही सदर कार्यालयाचे बाहेर येवून शासकीय वाहनाजवळ परत आलो आहे.

त्यानंतर पोनि श्रीमती नाईक मॅडम यांनी माझे कडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन ते बंद करुन मला व पंच नं. १ श्री. दौंड तसेच मित्र महेंद्र अशांना घडलेली हकीकत विचारली असता आम्ही वरील प्रमाणे सांगीतलेल्या हकिगत सांगीतली. तसेच त्यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकार्ड झालेले आमचे संभाषण ऐकले. मी व पंच नं.१ श्री दौंड, मित्र महेंद्र अशांनी सांगीतलेल्या हकिगती वरुन व व्हाईस रेकॉर्डर मध्ये माझेत व श्री.रामोळे तसेच मित्र महेंद्र यांचेत रेकॉर्ड झालेले संभाषण पोनि श्रीमती नाईक मॅडम, पंच व सापळा पथकातील सदस्यांनी ऐकल्यानंतर माझेकडे श्री.रामोळे साहेब हे जाखोडा धरणातुन गाळ काढण्याची परवानगी दिल्याचे मोहबदल्यात व गाळ काढण्याचे काम सुरु ठेवण्यासाठी तसेच केस न करण्यासाठी माझे कडुन पुर्वी घेतलेले ११०००/-रुपये मान्य करुन तडजोड अंती १५,०००/-रुपये लाचेची मागणी करीत असल्याची सर्वांची खात्री झाली. सदरचे मेमरी कार्ड काढुन ते पंच नं.२ यांचे ताब्यात दिले.

त्यानंतर श्रीमती नाईक यांचे सुचने प्रमाणे श्री.रामोळे साहेब, शाखाधिकारी यांना लाच म्हणुन देणे साठी मी १५०००/-रुपये माझे खिशातुन काढून हजर केले. त्यानंतर अ.पा. व अ.व्हा दिव्याचे बाबत आम्हांस माहिती सांगितली त्यानंतर सदर नोटांना पोना डोंगरे यांनी शासकीय वाहनात अ.पा. लावुन त्या नोटा माझे पॅन्टचे उजवे खिशांत ठेवल्या. त्यानंतर पोनि श्रीमती नाईक मॅडम यांनी मला व पंच नं. १ श्री.दौंड व मित्र महेंद्र अशांना कारवाई बाबत योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझे शर्टचे खिशांत ठेवले, मला व पंच नं. १ श्री.दौंड व मित्र महेंद्रे अशांना श्री.रामोळे यांचे भेटी साठी लघुपाटबंधारे कार्यालय सटाणा येथे माझे बोलेरो जिपने पाठविले आम्ही लघुपाटबंधोर कार्यालय सटाणा येथे गेलो आमचे पाठोपाठ श्रीमती नाईक मॅडम व सापळा पथक असे शासकीय वाहनाचे तेथे आले. श्री. रामोळे यांचे कार्यालय बंद होते म्हणुन मित्र महेंद्र यांनी श्री.रामोळे यांना त्यांचे मोबाईलवर कॉल केला व कुठे आहे साहेब असे विचारले असता श्री.रामोळे यांनी एस.टी. बसस्थानक सटाणा येथे बोलाविले म्हणून आम्ही तेथून निघुन एस.टी.बसस्थानक सटाणा येथे गेलो असता तेथे श्री.रामोळे साहेब यांची भेट झाली नाही. म्हणून पुन्हा मित्र महेंद्र यांनी श्री.रामोळे यांचे मोबाईलवर कॉल करुन बोलले असता श्री.रामोळे यांनी कळविले की, मी माझे ऑफीसला आलो आहे. त्यानंतर पुन्हा आम्ही बोलेरो वाहनात बसून लघुपाटबंधारे कार्यालय सटाणा येथे गेलो तेथे ऑफीस बंद होते म्हणून मी व महेंद्र यांनी पुन्हा श्री.रामोळे साहेब यांचे मोबाईलवर कॉल केला असता त्यांचा मोबाईल बंद असल्याचे समजुन आले. त्यानंतर आम्ही नवापुर जाणारेरोड जवळ आलो. त्यावेळी श्री.रामोळे साहेब सदर ठिकाणी मला दिसले आम्ही त्यांचेकडे जाण्यासा निघाले असता ते तेथुन कुठेतरी निघुन गेले. त्यानंतर आम्ही श्रीमती नाईक यांचे सुचनेप्रमाणे शासकीय वाहनाकडे आलो.

त्यानंतर श्रीमती नाईक यांनी पंच नं.१दौंड व मला तसेच मित्र महेंद्र यांना घडलेली हकीत विचारली असता आम्ही सर्वांनी वरील प्रमाणे हकीगत सांगितली. त्यानंतर आपण व आम्ही पंच व तक्रारदार व त्यांचा मित्र तसेच सापळा पथकातील सदस्य असे सटाणा ते मालेगांव जाणारे रोडवर एका कांदयाचे खळयासमोर थांबून राहीलो.

त्यानंतर १६.४५ वाजे पावेतो श्री.रामोळे यांचा मला व मित्र महेंद्र यांचे मोबाईल कॉल न आल्याने श्रीमती नाईक यांनी सर्वानुमते ठरविले की, आपण काही दिवस श्री.रामोळे साहेब यांचे फोनची वाट बघु त्यानंतर मला पुन्हा लावेची रक्कम घेवून पाठविण्याचे ठरविले.

त्यानंतर श्रीमती नाईक यांचे सुचनेप्रमाणे पंच नं.२ श्री.काकड यांनी माझे खिशातील लाचेची रक्कम काढून ती मोजून एक खाकी पाकीट मध्ये ठेवून सदरचे पाकीट बंद केले. ताब्यात घेतले.

त्यानंतर श्रीमती नाईक यांनी मला व महेंद्र यांना सुचना दिल्या की, तुम्ही आता घरी जा जर तुम्हा दोघांपैकी कोणाल्याही श्री.रामोळे शाखाधिकारी यांनी मोबाईलवर कॉल करुन बोलविले तर त्याबाबत आम्हास कळवा आम्ही सापळा पथकासह पुन्हा तुम्हास येवून भेटतो. तुम्ही दोघे तुमचे वाहनसह हजर रहा.त्यानंतर मी व मित्र महेंद्र असे तेथून निघून गेले.

दि.०२.०७.२०१९ रोजी मी, श्रीमती नाईक यांना कळविले की, श्री.रामोळे साहेब हे रजेवर गेले होते ते हजर झाले आहे तरी तुम्ही ०४.०७.२०१९ रोजी पुढील कारवाई साठी या त्यावर श्रीमती नाईक यांनी होय म्हणून सांगितले

दि.०४.०७.२०१९ रोजी ११.३० वाजता सटाणा गांवात नगर पालीका गार्डनचे जवळ गेटचे जवळ आलो त्यावेळी श्रीमती नाईक व त्यांचे सापळा पथक व दोन्ही पंच असे शासकीय वाहनासह तेथे हजर होते. त्यानंतर मी सापळा पथकातील सदस्य व पंचांना कळविले की, श्री.रामोळे साहेब हे त्यांचे नातेवाईक यांचे लग्नासाठी रजेवर गेले होते. ते रजेवरुन हजर झाले बाबत मला माहिती मिळाली आहे. तसेच श्री.रामोळे साहेब यांचे पुर्ण राजु पुना रामोळे असले बाबत समजले आहे. ते आता कार्यालयात आहे अगर कसे मला माहित नाही.

त्यानंतर सर्वानुमते श्री.रामोळे साहेब हे कार्यालयात हजर आहे अगर कसे बाबत खात्री करणे साठी मित्र महेंद्र यास पाठविण्याचे ठरले त्याप्रमाणे श्री.महेंद्र यास बोलेरो वाहनाने पाठविण्यात आले व तो थोडयाच वेळांत परत आले. त्यावेळी श्री.महेंद्र यांनी सांगितले की, मी लघुपाटबंधारे विभाग कार्यालय सटाणा येथे गेलो असता मला, श्री.रामोळे साहेब यांनी पाहीले व लगेच त्यांचे मो.सा.ने तेथुन निघुन गेले. ते माझे सोबत काही एक बोलले नाही. त्यांना काही तरी संशय आलेला असावा.

त्यानंतर मी पण म्हणालो की, श्री.रामोळे यांना दि.१३.०६.२०१९ रोजी काही तरी संशय आल्यामुळे त्यांनी आम्हाला पाहून पण आमचेकडून लाचेची रक्कम स्विकारण्यास टाळले आहे . तरी श्री.रामोळे हे आता आमचेकडून लाचेची रक्कम घेण्यास टाळाटाळ करीत आहे. ते या नंतर पण लाचेची रक्कम आमचे कडून घेणार नाही. तरी श्री.रामोळे यांनी माझेकडे लाचेची मागणी केली असून त्याप्रमाणे कारवाई करण्यात यावी.

त्यानंतर सर्वानुमते ठरविले की, आजून पण काही दिवस आपण श्री.रामोळे साहेब हे पुन्हा मला बोलवितात का? अगर करो त्यानंतर आपण पुढील कारवाई बाबत निर्णय घेवू. त्यानंतर श्रीमती नाईक यांनी आम्हाला घरी जाण्याची परवानगी दिली. तसेच ते पण तेथून निघून गेले.

तरी दि.१३.०६.२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजेचे सुमारास राजु पुना रामोळे, शाखाधिकारी लघुपाटबंधारे विभाग, सटाणा यांनी दि.१३.०६.२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजेचे सुमारास माझेकडे पंचासमक्ष जाखोडा धरणातुन गाळ काढण्याची परवानगी दिल्याने मोबदल्यात व गाळ काढण्याचे काम सुरु ठेवण्यासाठी तसेच केस न करण्यासाठी माझे कडुन पुर्वी घेतलेले ११०००/-रुपये मान्य करुन तडजोड अंती १५,०००/-रुपये लाचेची मागणी करुन ती लाचेची रक्कम स्विकारण्याचा प्रयत्न केला आहे म्हणून त्यांचे विरुध्द माझी फिर्याद आहे.

माझी फिर्याद मी वाचून पाहीली ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर टंकलिखीत करण्यात आलो आहे.

हि.फिर्याद लिहून दिली.

अरुण गोपीनाथ निकम

Scanned with CamScanner